ग्रामपंचायत कार्यालयीन कामी गैरवर्तन केल्याने
शिक्षा अंतिम करणे बाबत. (श्री.कुंडलिक नाना भगत
तत्कालीन ग्रामसेवक ग्रामपंचायत-पानोली,ता.पारनेर.)

जिल्हा परिषद अहिल्यानगर
ग्रामपंचायत विभाग
आदेश क्र. साप्रवि-२/ग्रापं-३/ २०९ /२०२६
दिनांक - स्वाक्षरी खाली नमुद केलेप्रमाणे

संदर्भ :- १.या कार्यालयाकडील दोषारोपपत्र क्र.साप्रवि-२/ग्रापं-३/७९६/२०२३, दि.१९/१०/२०२३.
२. या कार्यालयाकडील आदेश क्र.साप्रवि-२/ग्रापं-३/ई.क्र.२७४५७६२/२०२४, दि.२०/०८/२०२४ (चौकशी अधिकारी नियुक्ती)
३. सहा.आयुक्त (चौकशी), नाशिक यांचेकडील चौकशी अहवाल क्र.विशा.४/ खाचौ /सी.आर.१०८/२०२४, दि. १३/०९/२०२५ (प्राप्त दि.२५.११.२०२५.)
४. विभागीय चौकशी नियम पुस्तिका चौथी आवृत्ती १९९१ मधील प्रकरण सात मधील परिशिष्ठ ७.१
५. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील नियम २७ (१)
६.या कार्यालयाची अंतिम कारणे दाखवा नोटीस क्र.ग्रापं- ३/२११९२२०/ ७७९७८८६,दिनांक २१/०१/२०२६
७. गटविकास अधिकारी पंचायत समिती पारनेर यांचेकडील पत्र क्र.आस्था-२/ १७५/२०२६, दि.१२.०२.२०२६ नुसार श्री.कुंडलिक नाना भगत यांचा खुलासा दिनांक ०५/०२/२०२६.

संदर्भ क्रमांक ०१ अन्वये, श्री.भगत कुंडलिक नाना,तत्कालीन ग्रामसेवक ग्रामपंचायत पानोली तालुका पारनेर त्यांनी ग्रामपंचायत कार्यालयीन कामी गैरशिस्त व गैरवर्तन केल्याने दोषारोपपत्र बजावणेत आले होते.

संदर्भ क्रमांक ०२ नुसार श्री.भगत कुंडलिक नाना,तत्कालीन ग्रामसेवक यांचे गैरतर्वनाविरुध्द विभागीय चौकशी सुरु करणे कामी चौकशी अधिकारी यांची नेमणुक करणेत आली होती.

संदर्भ क्रमांक.३ नुसार सहाय्यक चौकशी अधिकारी नाशिक विभाग नाशिक यांनी चौकशी पुर्ण करुन चौकशी अहवाल या कार्यालयास सादर केलेला आहे. चौकशी अहवालामध्ये खालील प्रमाणे आरोपांच्या चौकशीचे निष्कर्ष नोंदविणेत आलेले आहेत.

वरीलप्रमाणे श्री.भगत कुंडलिक नाना,तत्कालीन ग्रामसेवक यांचे वर चौकशी करण्यात आलेल्या ०२ दोषारोपांपैकी ०२ दोषारोप विभागीय चौकशी मधे सिध्द झालेले आहेत. विभागीय चौकशी नियम पुस्तिका चौथी आवृत्ती १९९१ मधील प्रकरण सात मधील ७.१ नुसार चौकशी अहवालास सहमती दर्शविलेली असल्याने श्री.भगत कुंडलिक नाना,तत्कालीन ग्रामसेवक यांनी ग्रामपंचायत कार्यालयीन कामकाजात गैरवर्तन करुन, महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ मधील नियम ३ चा भंग केलेला आहे. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील नियम २७ (१) नुसार १० % टक्के सेवानिवृत्ती वेतनातुन ०२ वर्ष कपात करणेची शिक्षा अंतिम का करण्यात येऊ नये? या बाबतची नोटीस देण्यात आलेली आहे. खुलासा सादर न केल्यास अंतिम कारणे दाखवा नोटीस मध्ये नमुद

केलेली शिक्षा तुम्हांस मान्य आहे, असे गृहीत धरुन पुढील कार्यवाही करण्यात येईल, असे कळविण्यात आलेले आहे. संदर्भ क्रमांक ०७ अन्वये श्री.भगत कुंडलिक नाना,तत्कालीन ग्रामसेवक ग्रामपंचायत पानोली तालुका पारनेर त्यांनी याप्रकरणी खुलासा सादर केलेला आहे. श्री.भगत कुंडलिक नाना यांचे खुलाश्याचे अवलोकन करता प्राप्त खुलासाच्या अनुषंगाने श्री.भगत कुंडलिक नाना यांना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील नियम २७ (१) नुसार पुढील ५% एकरकमी सेवानिवृत्ती वेतनातून ०७ वर्ष कपात करणे ही शिक्षा या आदेशान्वये अंतिम करण्यात येत आहे. सदर आदेशाची नोंद संबधिताच्या सेवा पुस्तकात घेण्यात यावी.

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०६२६०६००९१ असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 26-06-2026 16:21:43
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रत:-

१. श्री.भगत कुंडलिक नाना,तत्कालीन ग्रामसेवक ग्रामपंचायत पानोली तालुका पारनेर.

द्वारा व प्रत- गटविकास अधिकारी, पंचायत समिती पारनेर, जि.अहिल्यानगर.

२. गटविकास अधिकारी, पंचायत समिती, पारनेर.

२/- सदर आदेशाची नोंद संबंधिताच्या मुळ सेवापुस्तकात घेण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.